महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र. मासंवि/मुमव्य/शिनि/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं. जी-९,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२-२६४७५९९५
फॅक्स क्रमांक : ०२२-२६५८०६४२

# सुधारपत्र क्र. २७ दि. २६/०७/२०१२

(म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम २००५)

**विषय :** न्यायालयाच्या कामकाजाकरिता हजर रहाण्यास कंपनीच्या माजी अधिकारी/ कर्मचारी यांना प्रवास भत्ता/दैनिक भत्ता लागू करणेबाबत.

-----------------------

प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९/०९/२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व्यवस्थाकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन कंपनीच्या कामकाजाकरिता न्यायालये, आयोग, पोलीस स्टेशन, कंपनी/सरकारी अभियोक्ते यांचेकडे हजर होण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी दैनिक भत्ता/प्रवास भत्ता याबाबतची तरतुद करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

२. परिणामी, म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम क्र. ८८ (झ) टीप (३) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

"लाचलुचपत विरोधी खात्याच्या/पोलीस खात्याच्या/फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणांत कंपनीच्या कर्मचाऱ्याविरुध्द साक्षीदार म्हणून न्यायालयाकडून बोलविण्यात आलेल्या व त्याकरिता प्रवास करावा लागणाऱ्या माजी नियुक्ती अधिकाऱ्यास त्याचप्रमाणे कंपनीच्या कामकाजाकरिता न्यायालये, आयोग, पोलीस स्टेशन, कंपनी/सरकारी अभियोक्ते यांचेकडे हजर राहण्यासाठी व त्याकरिता प्रवास करावा लागणाऱ्या माजी अधिकारी/ कर्मचारी यांना प्रवास भत्ता/दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. या प्रयोजनास्तव कंपनी सेवेतील त्याची/तिची अंतिम वेतनश्रेणी व वेतन ग्राह्य धरण्यात येईल. तथापि, असे अधिकारी/कर्मचारी विमान प्रवासासाठी पात्र समजण्यात येणार नाहीत. त्याचप्रमाणे अशा अधिकारी/कर्मचारी यांना कंपनीत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी लागु करण्यात आलेले विश्रामगृहाचे दर अनुज्ञेय असतील."

३. सदर दुरुस्ती पत्रक तत्काळ लागु करण्यात येत असून पुर्वी निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांना लागु राहणार नाही.

४. सदर दुरुस्ती पत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याच्या प्रती निर्गमित करण्यात आलेल्या नाहीत.

२६/७/१२

**(संदेश ए. हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**